Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV | ISSUE-V | MAY | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शासकीय योजनांचा आदिवासी स्त्रियांना होणारा लाभ

**निता प्रभाकरराव राऊत (गोठे)**
यवतमाळ

**डॉ. संध्या एस देवळे**
सहाय्यक प्राध्यापक
शासकिय कला व समाजविज्ञान संस्था,
नागपूर.

**सारांश**

*प्रस्तुत संशोधनात स्त्रियांसाठी असलेल्या विविध योजना कार्यान्वित होत असतांनाही त्याचा लाभ या स्त्रियांना होतो काय? कारण झाला तरच त्यांच्या विकासाला चालणा मिळेल त्यासाठी केळापूर तालुक्यातील १०० विविध वयोगटातील महिलांना प्राधान्य देऊन दुय्यम व प्राथमिक सामग्रीच्या आधारे माहिती प्राप्त करुन* $x^2$ *निष्कर्ष काढण्यात आले. यावरुन असे सिध्द झाले की, आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ अधिक झाला तर आदिवासी स्त्रियांच्या वयानुसार शासकीय योजनांच्या लाभामध्ये फरक दिसून आला.*

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासुन आपल्या देशात स्त्रिला प्रतिष्ठेचे स्थान मिळाले आहे. समाजजीवनाचे कुठलेही क्षेत्र सुरळीत चालवायचे असेल तर समाजातील प्रत्येक घटक तोलामोलाचा असणे आवश्यक आहे. आणि ज्या देशामध्ये स्त्रि जातीला सन्मानित व शिक्षीत केले जाते तोच देश प्रगती करू शकतो. स्वातंत्रोत्तर काळात जीवनाच्या सर्व क्षेत्रात घडुन आलेल्या क्रांतीकारक परिणामांमुळे स्त्रियांची स्थिती खुप बदललेली आहे. तिचे क्षेत्रही दिवसेंदिवस व्यापक झाले आहे. पुर्वि स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त चुल आणि मुल एवढेच होते. आज मात्र स्त्रियांनी घरचा उंबरठा ओलांडुन आकाशापर्यंत झेप घेतलेली दिसते. सर्व क्षेत्रात आपली छाप सोडुन ते क्षेत्र काबीज करण्याची मनीषा प्रत्येक स्त्रि मध्ये दिसते.

स्त्रि ही अहिंसेचा अवतार आहे. अहिंसा म्हणजे असीम प्रेम की ज्यात त्यागाची परिणती होते. तसेच स्त्रि ही भावी पिढीची निर्माती आहे. आपली ७० टक्के जनता ही खेडयात राहाते. त्यामुळे राष्ट्राच्या, देशाच्या, गावाच्या विकासामध्ये त्यांचा सुदधा मोठा हातभार लागत असतो. आणि केवळ पुरूषांचा विकास होवुन चालत नाही. तर स्त्रियांचा सुदधा विकास होणे तेवढेच गरजेचे आहे. आणि म्हणुनच आदिवासी भागातील स्त्रियांच्या क्षमतेचा विकास करणे आवश्यक आहे.

आदिवासी स्त्रियांना आजही दुय्यम दर्जा दिला जातो. तीच्या क्षमतेकडे, विविध गुणांकडे दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे ती एका चौकटीत जीवन जगत आहे. आणि या स्त्रिया आपल्या विकासाअभावी मागासलेल्या समजल्या जातात. म्हणुनच खरी गरज आहे ती या आदिवासी महिलांचा विकास घडवुन आणण्याची खरी गरज आहे.

विकसित देशाचे स्वप्न साकारण्याचे औचित्य साधुन या स्त्रि वर्गाचा, आदिवासी स्त्रियांचा विकास होणे महत्वाचे झाले आहे. सतत उद्भवणाऱ्या समस्या, महागाई यांना तोंड देण्यासाठी या समाजातील स्त्रियांनी आपल्या मधील गुणांचा, क्षमतांचा विकास केला तर नक्कीच समाजाचा व

देशाचा विकास होईल. व उद्‌भवणाऱ्या समस्यांना आळा बसुन 'विकसित देश' ही संकल्पना साकार होईल.

बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या या काळात ग्रामिण भागाचा विकास साधुन संपुर्ण भारताचा विकास करावयाचा असल्यास महिलांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणुन शासणाने महिलांना स्वावंलबी करण्यासाठी समाजात आत्मविश्वासाने व मानाने जगण्यासाठी अनेक योजना अमलांत आणल्या आहेत. त्याचे विवेचन होणे व त्या महिलांपर्यंत पोहचणे गरजेचे झाले आहे. आजची गरज होवु घातलेल्या 'स्त्रि सक्षमिकरण' ही शासणाची संकल्पणा यशस्वी होण्याकरिता या आदिवासी स्त्रियांचा विकास घडवुन आणुन शासणाच्या विविध योजनांव्दारे त्यांना स्वयंरोजगारातुन सक्षम करणे आज काळाची गरज आहे.

आदिवासी क्षेत्रातील महिलांचा विकास घडवुन आणण्यासाठी १९९४ मध्ये महाराष्ट्राने 'आदिवासी विकास एकात्मिक प्रकल्प', राज्यशासन यांच्या मार्फत विविध योजना कार्यान्वित केल्या गेल्या. यामध्ये महिलांच्या विकासासाठी 'माहेर योजना', 'महिला विकास केंद्र', 'अन्नपुर्णा योजना', 'शिवन मशिन वाटप', तसेच मोफत संगणक कक्ष प्रशिक्षण, स्वयंसहाय्यता गटाची योजना, आदिवासी प्रकल्पा अंतर्गत विविध उपक्रम व योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. अशा विविध योजना आदिवासी स्त्रियांसाठी असतांनाही त्याचा लाभ या स्त्रियांना होतो काय? कारण लाभ झाला तरच त्यांच्या विकासाला चालना मिळेल त्यासाठी या विषयाचे अध्ययन करणे अत्यंत महत्वपुर्ण ठरते.

**आदिवासी संज्ञेचा अर्थ**

आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबेरिजीनीस' या शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. प्रिमीटीव्ह म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि सव्हेज म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक.' प्रिमीटीव्ह किंवा सव्हेज या शब्दातुन आदिवासींचा मागासलेपणा, अज्ञान किंवा भोळेपणा सुचित होतो.

**रिव्हर्सच्या मते**

'एका विशिष्ठ भुप्रदेशावर राहणारा, समान बोली भाषा बोलणारा, व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी किंवा आदिम समुदाय असे म्हणतात.

**संशोधनाची गरज आणि महत्व**

वाढत्या महागाईच्या युगात कुटुंबाची गळचेपी झालेली दिसुन येते. आणि या कुटंबाच्या विकासामध्ये स्त्रियांचा मोठा वाटा असतो. त्यामुळे त्यांचा विकास घडवुन आणण्यात सदर विषय महत्वाची भुमिका पार पाडेल.

**संशोधनाची उद्दीष्टे**

- आदिवासी स्त्रियांचा सर्वसाधारण दर्जा जाणुन घेणे.
- आदिवासी स्त्रियांसाठी असणाऱ्या शासकिय योजनाच्या लाभांचे अध्ययन करणे.

**गृहितके**

- आदिवासी स्त्रियांना शासकिय योजनांचा लाभ होतो.
- आदिवासी शिक्षीत स्त्रियांना शासकिय योजनांचा लाभ अधिक होतो.
- आदिवासी स्त्रियांना वयानुसार शासकिय योजनाच्या लाभामध्ये फरक दिसुन येतो.

**संशोधनाचे क्षेत्र, व्याप्ती आणि मर्यादा**

प्रस्तुत संशोधन यवतमाळ जिल्हयातील केळापुर तालुक्यापुरते मर्यादित आहे. केळापुर तालुक्यामध्ये १४० गावे येतात. तेथिल आदिवासी महिलांना भेटुन त्यांच्याशी चर्चा करून प्रश्नावली देवुन, प्रत्यक्ष मुलाखत घेवुन माहिती गोळा केलेली आहे.

प्रस्तुत संशोधन करतांना १०० महिलांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये विविध वयोगटातील महिलांना प्राधान्य देण्यात आले आहे.

**संशोधन पदधती**

**संशोधानाची साधन सामुग्रीः**

संशोधनकार्य विविध प्रकारच्या साधन सामुग्रीशिवाय अशक्य असते. म्हणुन संशोधन कार्य पुर्णत्वास घेवुन जाण्यासाठी खालील साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**व्दितीयक तथ्य सामुग्री**

प्रस्तुत अध्ययनासाठी संभाव्य नमुनानिवड पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे समग्रातील सर्व उत्तरदात्यांना निवडीची संभाव्यता असते. संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छिक नमुन्याचा वापर करण्यात आला असुन त्यामधील लॉटरी पध्दतीने नमुना निवडुन $x^2$ ने गृहितकांची तपासणी करण्यात आली.

**प्राथमिक तथ्य सामुग्री**

प्रश्नावली, मुलाखत, प्रत्यक्ष निरिक्षण ई. प्राथमिक सामुग्री घेण्यात आली. विषयाशी संबंधीत पुस्तके, मासिके यांचा उपयोग करण्यात आला. तसेच शासकिय स्वरूपाची माहिती महिला आर्थिक विकास मंडळाचे कार्यालय, जिल्हा आदिवासी प्रकल्प कार्यालय, उद्योग भवन, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, जिल्हा परिषद ईत्यादी व्दारे प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक व व्दितीयक साधनसामग्रीच्या आधारे विषयाशी संबंधीत माहिती प्राप्त करण्यात आली.

**संकलीत माहितीचे विश्लेषन**

१. आदिवासी स्त्रियांचा सर्वसामान्य दर्जा.

**सारणी क्रं १.१**

**आदिवासी स्त्रियांचे वयोगटानुसार वर्गिकरण.**

| अनु. क्रं | वयोगट | वारंवारीता | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २०-४० | ३६ | ३६टक्के |
| २ | ४०-६० | ३५ | ३५ टक्के |
| ३ | ६० पेक्षा जास्त | २६ | २६ टक्के |
| | एकुन | १०० | १०० टक्के |

उपरोक्त सारणी वरून असे दिसुन येते कि, एकुण आदिवासी स्त्रिया या सर्वाधीक ३६ टक्के असुन या स्त्रिया २०-४० या वयोगटाच्या आहेत. तर ३५ टक्के आदिवासी स्त्रिया हया ४०-६० वयोगटाच्या आहेत. तर २६ टक्के आदिवासी स्त्रिया हया ६० पेक्षा अधिक वयोगटाच्या आहेत

**सारणी क्रं १.२**

**आदिवासी स्त्रियांचे शिक्षणानुसार वर्गिकरण**

| अ.क्रं | शिक्षण | वारंवारीता | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षीत | २० | २० टक्के |
| २ | अशिक्षीत | ८० | ८० टक्के |
| | एकुण | १०० | १०० टक्के |

उपरोक्त सारणी वरून असे दिसुन येते की, आदिवासी अशिक्षीत स्त्रिया हया ८० टक्के असुन शिक्षीत स्त्रियांच्या आदिवासींचे प्रमाण २० टक्के असल्याचे आढळुन आले. एकंदरित जास्तीत जास्त आदिवासी स्त्रिया या शिक्षित असल्याचे दिसुन येतात. तर शिक्षीत आदिवासी स्त्रियाचे प्रमाण कमीत कमी निदर्शनास येते.

**सारणी क्रं १.३**

**आदिवासी स्त्रियांचे व्यवसायानुसार वर्गिकरण**

| अनु. क्रं | व्यवसाय | वारंवारीता | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शेती | ५० | ५०टक्के |
| २ | स्व- वयवसाय | २५ | २५ टक्के |
| ३ | मजुरी | २५ | २५ टक्के |
| | एकुण | १०० | १०० टक्के |

उपरोक्त सारणी वरून असे दिसुन येते की,आदिवासी स्त्रिया हया ५० टक्के शेती करतात. तर स्व-व्यवसाय २५ टक्के आदिवासी महिला करतात.तर २५ टक्के आदिवासी स्त्रिया हया मजुरी करित असल्याचे दिसुन येते. एकंदरीत पाहता यावरून जास्तीत जास्त आदिवासी स्त्रिया हया शेती करतात तर स्वतःचा व्यवसाय आणि शेती करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास येते.

**ससारणी क्रं. १.४**

**आदिवासी स्त्रियांचे उत्पन्नानुसार वर्गिकरण**

| अनु.क्रं | मासीक उत्पन्न | वारंवारीता | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | रूपये ५०० | ४० | ४०टक्के |
| २ | रूपये ६०० | ३० | ३० टक्के |
| ३ | रूपये ७०० | २२ | २२ टक्के |
| ४ | रूपये ७०० चे वर | ०८ | ०८ टक्के |
| | एकुण | १०० | १०० टक्के |

उपरोक्त सारणी वरून असे दिसुन येते की, रूपये ५०० उत्पन्न असणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे प्रमाण ४० टक्के तर रूपये ६०० उत्पन्न असणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे प्रमाण ३० टक्के तर ७०० रूपये उत्पन्न असणाऱ्या पमाण २२ टक्के तर रूपये ७०० चे वर उत्पन्न असणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे प्रमाण ०८ टक्के आहे. एकंदरित पाहाता यावरून जास्तीत जास्त

५०० रूपये मासिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी स्त्रिया आहेत. तर कमीत कमी रूपये ७०० चे वर उत्पन्न असणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे प्रमाण असल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्रं २.१**
**गृहितकांची पडताळनी**
**आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ दशविणारी सारणी.**

| अ.क्रं | शासकिय योजनांचा लाभ | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| १ | ७२(७२ टक्के) | २८(२८ टक्के) | १००(१०० टक्के) |

- सार्थकः- (स्वाधीनता मात्रा १ आणि ५ टक्के सार्थकता स्तरावर प्राप्त. $x^2$ =१६.३२, तक्ता मुल्य = ३.८४१)

प्रस्तुत संशाधनात वरिल सारणी मध्ये प्राप्त $x^2$=१६.३२ इतका आढळुन आलेला आहे. त्यामुळे एक स्वाधीनता मात्रा आणि ५ टक्के स्तरावर $x^2$तक्तामुल्य ३.८४१ आलेला आहे. हा तक्तामुल्यांपेक्षा जास्त असल्याने तो लक्षणीय आहे. त्यामुळे आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ होतो.

यावरून असे सिध्द होते की, शुन्य गृहितक हे अस्विकारणीय आहे. आणि संशोधनासाठी घेतलेले गृहितक हे स्विकारणीय आहे.

**गृहितक** $H_1$ : आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ होतो.

**शुन्य गृहितक** $H_0$: आदिवासी स्त्रियांना शासकीय यांजनांचा लाभ होत नाही.

**शिक्षणानुसार योजनांचा लाभ दर्शविणारी सारणी.**
**सारणी क्रं २.२**

| अ.क्रं | शासकिय योजनांचा लाभ | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| १ | १७ (१७ टक्के) | ३(३ टक्के) | २०(२० टक्के) |
| २ | ६४(६४ टक्के) | १६(१६ टक्के) | ८०(८० टक्के) |
| | (८१ टक्के) | (१६ टक्के) | (१०० टक्के) |

- सार्थकः- (स्वाधीनता मात्रा १ आणि ५ टक्के सार्थकता स्तरावर प्राप्त.$x^2$ =५०.५६, तक्ता मुल्य = ३.८४१)

प्रस्तुत संशोधना वरिल सारणीमध्ये प्राप्त $x^2$मुल्य ५०.५६ इतका आढळुन आलेला आहे. त्यामुळे १ स्वाधीनता मात्रा आणि ५ टक्के स्तरावर $x^2$तक्ता मुल्य ३.८४१ आहे. आलेला तक्तामुल्य अधिक असल्यामुळे तो लक्षणीय आहे. त्यामुळे आदिवासी शिक्षीत स्त्रियांना शिक्षणानुसार शासकीय योजनांचा लाभ होतो.

यावरून असे सिध्द होते की शुन्य गृहितक हे अस्विकारणीय आहे.

**गृहितक** $H_1$ : शिक्षीती स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ अधीक होतो.

**शुन्य गृहितक** $H_0$: आदिवासी स्त्रियांना शासकीय यांजनांचा लाभ अधीक होत नाही.

**वयानुसार शासकीय योजनांचा लाभ दर्शविणारी सारणी.**

**सारणी क्रं २.३**

| अ.क्रं | शासकिय योजनांचा लाभ | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नही | |
| १ | ३२ (३२ टक्के) | ५(३ टक्के) | ३६(३६ टक्के) |
| २ | २१(२१ टक्के) | ७(७ टक्के) | २६(२६ टक्के) |
| ३ | १९(१९ टक्के) | १६(१६ टक्के) | ३५(३५ टक्के) |
| | (७२ टक्के) | (२८ टक्के) | (१०० टक्के) |

- सार्थकः- (स्वाधीनता मात्रा २ आणि ५ टक्के सार्थकता स्तरावर प्राप्त$x^2$ =८.३६, तक्ता मुल्य = ५.९९)

प्रस्तुत संशोधनात वरिल सारणी मध्ये प्राप्त $x^2$मुल्य ८.३६ इतका आढळुन आलेला आहे. त्यामुळे २ स्वाधीनता मात्रा आणि ५ टक्के स्तारावर ग$^2$ तक्ता मुल्य =५.९९ आहे. आलेला तक्तामुल्य हा तक्तामुल्यापेक्षा अधीक असल्यामुळे तो लक्षणीय आहे. त्यामुळे वयानुसार आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ होतो.

यावरून असे सिध्द होते की, शुन्य गुहितक हे अस्विकारणीय आहे. आणि संशोधनासाठी घेतलेले गृहितक हे स्विकारणीय आहे.

**गृहितक $H_1$** : वयानुसार शासकीय योजनांच्या लाभामध्ये फरक दिसुन येतो.

**शुन्य गृहितक $H_0$**: वयानुसार शासकीय योजनांच्या लाभामध्ये फरक दिसुन येत नाही.

**निष्कर्श आणि शिफारशी**

संपुर्ण संशोधनाचे सर्वेक्षण व संकलीत माहितीच्या आधारे खालील निष्कर्श निघालेले आहेत.

- आदिवासी स्त्रियांना शासकीय योजनांचा लाभ होतो.
- शिक्षीत आदिवासी स्त्रियांना योजनांचा लाभ अधीक होतो.
- आदिवासी स्त्रियांच्या वयानुसार शासकीय योजनांच्या लाभामध्ये फरक दिसुन येतो.

**शिफारशी**

- शासकीय योजनांचा माहिती तळागाळापर्यत पोहचवुन लाभार्थ्यांची संख्या वाढवावी. जेणे करून अधीकाधीक महिलांचा सहभाग त्यामध्ये होईल.
- आगामी २०२० मध्ये भारताला महासत्ता बनायचे असेल तर आदिवासी स्त्रियांना आर्थिकदृष्टया बळकट केले पाहिजे.

- ❖ आदिवासी स्त्रियांना माहित असलेल्या जंगलातील खनिज संपत्ती, वन्यजीव व वनौषधींची मोठया प्रमाणात माहिती असल्यामुळे त्यांच्या माहितीत स्वयंरोजगाराचे स्वरूप देवुन त्यांचा विकास साधावा.
- ❖ आदिवासी स्त्रियांना विविध योजनांची स्पष्ट माहिती व प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथसुची**

१ भांडारकर प.ल.: सामाजिक संशोधन पध्दती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी वसंत पिंपळापुरे, विद्या बुक्स, चौथी आवृत्ती, नागपूर, १६११.
२ बापट भा.गो. : शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे, १६७७.
३ फडके सुधिर : महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न, पुणे, १६६३.
४ पंचायत राज आणि युती शासनाची वाटचाल – महाराष्ट्र शासन पुस्तिका
५ गारे गोविंद : आदिवासींचे प्रश्न – आदिम प्रकाशन, पुणे १६७६.
६ गारे गोविंद : आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठाण, पुणे, १६६८
७ संगवे विलास : आदिवासी सामाजिक जीवन – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १६७८.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com